**मोटार अपघात दावा क्र.४२/२०२४**
**सिमा विरुध्द परमेश्वर**
**निशाणी क्रमांक ३०**

**पुढील सरतपास शपथेवर अर्जदारातर्फे श्री. आर.ए. सय्यद, विधीज्ञ**

माझ्या सरतपासातील मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. तो माझ्या सांगण्याप्रमाणे लिहिलेला आहे.

**सामनेवाला तर्फे उलटतपास श्री.आर.व्ही. गायकवाड, विधीज्ञ यांच्या मार्फत**

३. मी इयत्ता १० वी पास आहे. उदगीर – अहमदपूर हा रस्ता वर्दळीचा रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या रस्त्यावर वाहनाची सतत येजा चालू असते. ज्या ठिकाणी घटना घडली आहे त्या ठिकाणच्या आजूबाजूला दुकाने व हॉटेल्स आहेत. हकनाकवाडीचे वळण हे मोठे वळण आहे. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या वेळी सदर रस्त्यावर मधोमध पांढरी पट्टी होती. मी उदगीर वरुन गावी जात असताना माझ्या समोर किती वाहने चालली होती ते मला सांगता येणार नाही. घटना घडली ती वेळ अंधाराची वेळ होती. आमच्या गाडयाच्या लाईट चालू केल्या नव्हत्या. माझ्या व रवीच्या गाडी मध्ये ४० ते ५० फुटाचे अंतर होते. हे म्हणणे खरे आहे की, मी व रवी याने अनेक वाहनांना ओव्हर टेक केले होते. हे म्हणणे खरे नाही की, रवी ओव्हर टेक करत असतांना रस्त्याच्या विरुद्ध बाजूस गेला व समोरुन येणा–या गाडीला धडकला. हे म्हणणे खरे नाही की, अपघाताची घटना पांढ–या पट्टीच्या उजव्या बाजूला घडली. हे म्हणणे खरे नाही की,अपघात झाल्यावर दोन्ही जखमी व त्यांची वाहने पांढ–या पट्टीच्या उजव्या बाजूला पडले होते. घटना घडल्यावर २५ लोक जमा झाले होते. अपघाता नंतर रवीला उचलण्यासाठी ज्यांनी मदत केली त्यांची नावे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, अपघातातील दुस–या जखमीची नाव जाणून घेण्याचा मी प्रयत्न केला नाही. दुस–या जखमीला दवाखान्यात नेण्याकरीता मी प्रयत्न केला नाही.

४. मी पोलीस ठाण्यात जबाब दिलेला आहे. माझ्या जबाबात मी मोटार सायकल स्वाराचे नाव व वाहन क्रमांक पोलीसांना सांगितला नव्हता. माझ्या जबाबात मी चालवत असलेल्या वाहनाचे नाव व क्रमांक व रवी चालवत असलेल्या वाहनाचे नाव क्रमांक पोलीसांना सांगितला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, अशा प्रकारची घटना घडल्यावर पोलीस ठाण्यात तक्रार द्यावयाची असते म्हणून मी तक्रार दिली. हे म्हणणे खरे नाही की, घटना मी पाहीली नव्हती व रवीच्या कुटूंबाला नुकसान भरपाई मिळण्या करीता मी खोटी तक्रार दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल केले असून खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

Digitally signed by DIPAK BABALI MHALATKAR
Date: 2026.03.24 17:30:01 +0530

( डी.बी. म्हालटकर )

दि. १३/०३/२०२६ जिल्हा न्यायाधीश–१, उदगीर